आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२३ एप्रिल २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा दलं सतर्क, हल्लेखोरांचा शोध जारी
- काश्मीरमधे अडकलेल्या पर्यटकांसाठी विशेष विमानांची व्यवस्था
- पहलगाम हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू तर १६ जण गंभीररीत्या जखमी/ मृतांमधे महाराष्ट्रातले ६ जण
- दहशतवादाच्या विरोधात साऱ्या जगाचा भारताला पाठिंबा
- पुण्याची एफ.टी.आय.आय.आणि कोलकत्याची सत्यजित रे चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था यांना अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्रदान

  **आणि**
- आयएसएसएफ नेमबाजी स्पर्धेत भारत सात पदकं जिंकून तिसऱ्या स्थानावर

**<><><><><>**

काश्मीरमधे पहलगाम इथं काल झालेल्या दहशतवादी हल्ल्याबद्दल सर्वत्र तीव्र निषेधाची लाट उमटली आहे. या हल्ल्यात आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार २७ जणांचा बळी गेला असून त्यातले बहुसंख्य पर्यटक होते. महाराष्ट्रातल्या ६ पर्यटकांचा या हल्ल्यात मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. जम्मू काश्मीर सरकारने मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी १० लाख रुपये आणि गंभीर रीत्या जखमी झालेल्यांना प्रत्येकी २ लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे. महाराष्ट्रातले आणखी किती पर्यटक तिथं होते याचा शोध राज्यसरकार घेत आहे. पहलगाम आणि जम्मू काश्मीरमधे पर्यटकांच्या मदतीसाठी विशेष कक्ष स्थापन करण्यात आला असून हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध आहेत. ते याप्रमाणे. ०१९३२२२२२३३७, ७७८०८८५७५९,

९६९७९८२५२७, आणि ६००६३६५२४५. मदत क्रमांक पुन्हा एकदा ऐका....

०१९३२२२२३३७ ,

७७८०८८५७५९,

९६९७९८२५२७, आणि

६००६३६५२४५.

याखेरीज जिल्ह्याजिल्ह्यांमधे मदतीसाठी हेल्पलाईन उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

लष्कर ए तैयबा या दहशतवादी संघटनेच्या द रेझिस्टन्स फ्रंट या गटानं या हल्ल्याची जबाबदारी घेतली आहे. दरम्यान, या भ्याड हल्ल्याच्या सूत्रधारांना पकडण्यासाठी सुरक्षा दलांनी शोधमोहीम तीव्र केली आहे. संशयित दहशतवाद्यांची रेखाचित्रं तयार करुन सर्वत्र कसून शोध घेण्यात येत आहे. पर्यटकांवर हल्ला झाल्याच्या निषेधार्थ जम्मू काश्मीरमधे आज बंद पाळण्यात येत आहे. विविध राजकीय पक्ष आणि संघटनांतर्फे या हल्ल्याच्या निषेधात शांततापूर्ण निदर्शन करण्यात येत आहेत.

पहलगाम, दक्षिण काश्मीरमधे अनंतनाग, कुलगाम आणि इतर जिल्ह्यांमधे सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी,संरक्षण समत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी

वैष्णव, केंद्रीय मंत्रिमंडळाचे इतर सदस्य, राज्याराज्यांचे राज्यपाल, मुख्यमंत्री आणि इतर मंत्रिगण यांनी या भ्याड हल्ल्याचा निषेध केला असून मृतांच्या कुटुंबियांप्रति शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत. देशातल्या सर्व राजकीय पक्षांनीही या हल्ल्याचा निषेध केला आहे. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी म्हटलंय की हा हल्ला शोकाकुल करणारा असून सारा देश दहशतवादाच्या विरोधात एकवटला आहे.

**<><><><>**

या हल्ल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपला सौदी अरेबियाचा दौरा सोडून भारतात परतले आहेत. आल्यानंतर त्यांनी विमानतळावरच परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यासह वरीष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करुन परिस्थितीचा आढावा घेतला.

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, नायब राज्यपाल मनोज सिन्हा , जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी आज श्रीनगरमध्ये पोलीस नियंत्रण कक्षात पहलगाम दहशतवादी हल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना पुष्पांजली अर्पण केली. यावेळी अमित शहा यांनी मृतांच्या कुटुंबियांशी संवाद साधून त्यांचं सांत्वन केलं. मृतांचं पार्थिव विशेष विमानानं श्रीनगरहून त्यांच्या मूळ ठिकाणी पाठवलं जात आहे.

यानंतर गृहमंत्र्यांनी पहलगामजवळ बैसरन इथं प्रत्यक्ष हल्ल्याच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा देखील होते. गृहमंत्री जखमींवर उपचार सुरू असलेल्या अनंतनाग इथल्या सरकारी रुग्णालयाला भेट देऊन जाऊन जखमींची विचारपूसही करणार आहेत.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज तिन्ही दलांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत काश्मीर खोऱ्यातल्या परिस्थितीचा आढावा घेतला. लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सध्याच्या स्थितीची माहिती सिंह यांना दिली. हल्ला झालेल्या परिसरात सैन्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवण्यात आलं आहे. परिसरात शोधमोहीम राबवण्यासाठी सैन्याचे जवान तैनात करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

पहलगाम इथे काल झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय नागरी विमानवाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी गृहमंत्री अमित शहा यांच्याशी श्रीनगरहून दिल्ली आणि मुंबईसाठी अधिक विमान उड्डाणं आयोजित करण्याविषयी चर्चा केली. नायडू यांनी सर्व विमान कंपन्यांसोबत तातडीची बैठक घेतली. विमान कंपन्यांना नियमित भाडे पातळी राखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांचे मृतदेह त्यांच्या मूळ राज्यात पोहोचवण्यासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे निर्देशही नायडू यांनी विमान कंपन्यांना दिले. दिल्ली आणि मुंबईसाठी प्रत्येकी दोन अशा चार उड्डाणांची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती, नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने दिली आहे.

**<><><><><>**

पहलगाम इथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातल्या एकूण ६ पर्यटकांचा मृत्यू झाला असून त्यांचे मृतदेह राज्यात परत आणणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. एअर इंडियाच्या श्रीनगरहून मुंबईकरता सव्वा बारा वाजता रवाना झालेल्या विमानातून संजय लेले आणि दिलीप डिसले

यांचं पार्थिव येईल. हेमंत जोशी आणि अतुल मोने यांचे मृतदेह दुपारी सव्वा वाजता निघणाऱ्या विमानातून मुंबईत येतील.

पुण्यातले कौस्तुभ गणवते आणि संतोष जगदाळे यांचे मृतदेह संध्याकाळी सहाच्या विमानाने पुण्यात आणण्यात येणार आहेत, अशी माहिती फडणवीस यांनी आपल्या समाज माध्यमावर दिली आहे. मुंबई विमानतळावर मंत्री आशिष शेलार आणि मंगलप्रभात लोढा तर पुणे विमानतळावर मंत्री माधुरी मिसाळ यांच्याकडे समन्वयाची जबाबदारी देण्यात आली आहे. मंत्री गिरीश महाजन हे श्रीनगरसाठी रवाना होत असून इतर पर्यटकांना परत आणण्यासाठी व्यवस्था करण्यात येत असल्याचंही फडणवीस यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या जगभरातल्या नेत्यांनी तीव्र निषेध करत, भारताला पाठिंबा दर्शवला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या हल्ल्याचा निषेध करत दहशतवादाविरोधातल्या लढाईत अमेरिका भारतासोबत असल्याचं म्हटलं आहे. त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली आणि या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांबद्दल शोक व्यक्त केला.

ब्रिटनचे प्रधानमंत्री केअर स्टारमर यांनी हा विनाशकारी असल्याचं म्हणत, हल्ल्यातले पीडित आणि भारतीय नागरिकांसोबत सहेवेदना व्यक्त केल्या आहेत.

जर्मनीचे चान्सलर ओलाफ शोल्झ यांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे. या हल्ल्यातले जखमी लवकर बरे व्हावेत अशी प्रार्थना त्यांनी केली आहे.

डेन्मार्कच्या प्रधानमंत्री मेटे फ्रेडरिकसेन यांनी या कठीण काळात भारतासोबत असल्याचं म्हटलं आहे.

इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांनीही या हल्लाच्या तीव्र निषेध केला आहे.

युरोपियन आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांनीही या संकटात युरोप भारतासोबत खंबीरपणे उभा असल्याचं म्हटलं आहे.

गयानाचे राष्ट्राध्यक्ष इरफान अली यांनी या हल्ल्याला घृणास्पद कृत्य म्हणत, या हल्ल्याचा निषेध केला आहे.

ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांनी हिंसाचाराचं समर्थन करता येणार नाही असं म्हणत या हल्ल्याचा निषेध केला.

न्यूझीलंडचे परराष्ट्र व्यवहार मंत्री विन्स्टन पीटर्स यांनी काश्मीरमधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध करत, भारताला पाठिंबा दर्शवला आहे. भारतातल्या युक्रेन दूतावासानं या हल्ल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

पहलगाम इथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन या अमेरिका आणि पेरू देशाचा दौरा पूर्ण करून भारतात परतत आहेत. या कठीण काळात भारतीयांसोबत राहण्यासाठी त्या लवकरात लवकर भारतात येत आहेत, अशी माहिती अर्थ मंत्रालयाने समाज माध्यमावरच्या संदेशात दिली आहे.

**<><><><><>**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं पुणे इथली भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था अर्थात एफ.टी.आय.आय. आणि कोलकत्यातल्या सत्यजित रे चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्रदान केला आहे. या संदर्भातली अधिसूचना शिक्षण मंत्रालयानं काल जारी केली. विद्यापीठ अनुदान आयोगानं केलेल्या शिफारशीनुसार या दोन्ही संस्थांना अभिमत विद्यापीठाचा दर्जा दिला गेल्याचं अधिसूचनेत म्हटलं आहे.

या निर्णयामुळे या दोन्ही संस्थांना आता विद्यापीठ अनुदान आयोग आणि नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार डॉक्टरेट, संशोधन आणि नवोन्मेषी शैक्षणिक अभ्यासक्रम आणि उपक्रम राबवता येतील. याशिवाय आता या दोन्ही संस्थांचा राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखडा तसंच शैक्षणिक श्रेण्यांक पेढी अर्थात अकॅडमिक बँक ऑफ क्रिडिटमध्ये समावेश केला जाणार आहे.

हा निर्णय नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत असून, त्यामुळे स्वायत्तता, नवोन्मेष तसंच चित्रपट आणि माध्यम विषयक शिक्षण क्षेत्रातल्या उत्कृष्टतेचा मार्ग अधिक प्रशस्त होणार असल्याचं मंत्रालयानं कळवलं आहे.

**<><><><><>**

आयएसएसएफ अर्थात आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघानं आयोजित केलेल्या अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं सात पदकं जिंकत तिसरं स्थान पटकावलं आहे. यात दोन सुवर्ण, चार रौप्य आणि एका कांस्य पदकाचा समावेश आहे. सिमरनप्रीत कौर ब्रार हिनं २५ मीटर पिस्टल प्रकारात रौप्य पदक पटकावत स्पर्धेचा शेवट गोड केला. अमेरिका एकूण सात पदकं जिंकत स्पर्धेत दुसऱ्या स्थानावर आहे, तर चीनने चार सुवर्ण, तीन रौप्य आणि सहा कांस्य पदकांची लयलूट करत स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैद्राबाद आणि मुंबई इंडियन्स संघादरम्यान हैद्राबाद इथे सामना खेळला जाणार आहे

लखनौ इथे काल झालेल्या साखळी सामन्यात दिल्ली कॅपिटल संघाने लखनौ सुपर जायंट्स संघाचा ८ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना लखनौच्या सुपर जायंट्स संघाने ६ गडी बाद १५९ धावा केल्या. दिल्ली कॅपिटल संघाने २ गड्यांच्या मोबदल्यात १६१ धावा करुन सामना जिंकला.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२३ एप्रिल २०२५ - बुधवार